केंद्र पुरस्कृत मिशन शक्ती या कार्यक्रमांतर्गत प्रधानमंत्री मातृवंदना योजना (PMMVY) या योजनेची SNA-SPARSH या निधी प्रवाह कार्यपध्दतीतून अंमलबजावणी करण्याकरिता केंद्र शासनाने सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाकरीता Mother Sanction केलेल्या निधीच्या वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र.४६/का.५

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ११ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०२३/प्र.क्र.१६/का.५, दि. १९.१२.२०२४,
२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२०२५/प्र.क्र.४५/का.४, दि. २०.३.२०२५,
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.९.४.२०२६,
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.७.५.२०२६,
५) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/का-६, दि.१३.५.२०२६,
६) सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. .बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.५.२०२६,
७) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि-२०२६/प्र.क्र.४६/का-५, दि.८.५.२०२६,
८) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि-२०२६/प्र.क्र.४५/का-५, दि.२५.५.२०२६,
९) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.एबावि-२०२६/प्र.क्र.४४/का-५, दि.२२.५.२०२६,
१०) महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.NO.PM-११/१/२०२६-PMMVY, दिनांक २८.७.२०२६.

प्रस्तावना :-

केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी SNA SPARSH ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती लागू करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे.

केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार मिशन शक्ती मधील “सामर्थ्य” या कार्यक्रमांतर्गत राज्यात प्रधानमंत्री मातृवंदना योजना (PMMVY) ही योजना महिला व बाल विकास विभागामार्फ़त राबविण्यास संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेकरिता केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण **६०:४०** असे आहे.

त्यानुषंगाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री मातृवंदना योजना (PMMVY) या योजनेकरिता संदर्भाधीन क्र. १० येथील पत्रान्वये दिलेल्या मातृ मंजूरीस (Mother Sanction) अनुसरून उपलब्ध असलेल्या अर्थसक्रंल्पीय तरतूदीमधून केंद्र हिश्याचा निधी व त्यास समरूप राज्य हिश्याचा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मिशन शक्ती मधील “सामर्थ्य” या कार्यक्रमांतर्गत प्रधानमंत्री मातृवंदना योजना (PMMVY)) या योजनेकरिता केंद्र शासनाने सर्वसाधारण (General), अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) या सर्व प्रवर्गाकरीता मंजूर केलेल्या निधीच्या मर्यादेत केंद्र व त्यास समरुप राज्य हिश्याखाली खालीलप्रमाणे रकाना क्र. २ येथील लेखाशीर्ष / उद्दिष्टामधून रकाना क्र. ५ येथे नमूद **केल्यानुसार एकूण रुपये ७२,४१,०६,८१६ कोटी (अक्षरी रुपये बाहत्तर कोटी एक्केचाळीस लाख सहा हजार आठशे सोळा फ़क्त/-)** एवढा निधी नियंत्रक अधिकारी तथा एकल समन्वय यंत्रणा (Single Nodal Agency- SNA SPARSH) म्हणून आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरीत व खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(आकडे रुपयात)

प्रधान लेखाशीर्ष / संगणक सांकेतांक / उद्दिष्ट	केंद्र शासनाने आतापर्यंत Mother Sanction केलेलानिधी	अर्थसंकल्पिय तरतूद सन २०२६-२७	यापूर्वी वितरीत निधी	या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५
सर्वसाधारण (General)				
मागणी क्र. X-१ २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२-समाज कल्याण १०३-महिला कल्याण (३२) मिशन शक्ती या एकछत्री योजने अंतर्गत सामर्थ्य उपयोजना (३२) (०५) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना-(केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम) २२३५ D ७११ ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	७४,००,३५,९१०	७०,९१,२५,०००	३८,०८,३९,९१०	३२,८२,८५,०९०
(३२) (०६) प्रधानमंत्री मातृ वंदना योजना-(राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) २२३५ D ७२२ ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (वेतनेत्तर)		४७,२७,५०,०००	२५,३८,९३,२७३	२१,८८,५६,७२६
एकूण (अ)	**७४,००,३५,९१०**	**११८,१८,७५,०००**	**६३,४७,३३,१८३**	**५४,७१,४१,८१६**
अनुसूचित जाती (SC)				
मागणी क्र. एन. ०३ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२- समाज कल्याण, ७८९- अनुसूचित जातीसाठी विशेष घट्क योजना (०२)-अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना (०२) (०२) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (मिशन शक्ती अंब्रेला योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) २२३५ D ८९२ ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	११,१९,८४,९०५	१८,००,००,०००	४,५३,२१,९०५	६,६६,६३,०००
(०२) (०३) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (मिशन शक्ती अंब्रेला योजना) (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम) २२३५ D ९०९ ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)		१२,००,००,०००	३,०२,१४,६०३	४,४४,४२,०००
एकूण (ब)	**११,१९,८४,९०५**	**३०,००,००,०००**	**७,५५,३६,५०८**	**११,११,०५,०००**

अनुसूचित जामाती (ST)				
मागणी क्र.टी-०५ २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२- समाज कल्याण, ७९६- जनजाति क्षेत्र उपयोजना (०२)- जनजाति क्षेत्राबाहेरील उपयोजना (०२) (१०) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (मिशन शक्ती अंब्रेला योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम) २२३५ D ९१८ , ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)	७,९०,६१,५८५	१६,९२,००,०००	३,९५,४५,५८५	३,९५,१६,०००
(०२) (११) प्रधानमंत्री मातृवंदना योजना (मिशन शक्ती अंब्रेला योजना) (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम) २२३५ D ९२७ , ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर)		११,२८,००,०००	२,६३,६३,७२३	२,६३,४४,०००
एकूण (क)	**७,९०,६१,५८५**	**२८,२०,००,०००**	**६,५९,०९,३०८**	**६,५८,६०,०००**
एकूण सर्व (अ + ब + क)	**९३,१०,८२,४००**	**१७६,३८,७५,०००**	**७७,६१,७८,९९९**	**७२,४१,०६,८१६**

२. सदर निधी SNA SPARSH प्रणालीव्दारे उपयोजनात आणण्यात यावा. त्यानुषंगाने केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सदर निधी उपयोजनात आणण्याची कार्यवाही आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी करावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ३ येथील दि.९.४.२०२६ व संदर्भाधीन क्र.४ येथील दि.७.५.२०२६ रोजीचे शासन परिपत्रक तसेच आदिवासी विकास विभागाच्या संदर्भाधीन क्र.५ येथील दि.१३.५.२०२६ व सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भाधीन क्र. ६ येथील दि.१९.५.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रक अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे. त्यानुसार सदर परिपत्रकांमधील सूचना विचारात घेऊन कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८१११५२६४२८९३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.08.11 16:29:37 +05'30'

(वि. रा. ठाकूर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),(लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,

३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

४) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.व बा.वि.),जिल्हा परिषद,

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,

७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,

८) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२) / वित्त विभाग (व्यय-६), मंत्रालय, मुंबई,

९) कक्ष अधिकारी (का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१०) कक्ष अधिकारी (का-५), सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,

११) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे उपयोजनात आणण्याकरिता विहित पध्दतीने वितरीत करावा,

१२) निवड नस्ती -का-५.